# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक १५/०३/२०२५ (शनिवार) दुपार

---

**अवैध दारू, अंमलीपदार्था, ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह बाबत दिनांक १०/०३/२०२५ ते १४/०३/२०२५ नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांची विशेष मोहीम**
**अवैध दारू बाबत २८६ गुन्हे नोंद एकुण ४८,६०,७४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त**
**अंमलीपदार्थ सेवन करणाऱ्या ३३ आरोपीविरूध्द कारवाई ,२६५ ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह केसेस**

होळी,रंगपंचमी सणोउत्सोव निमित्यांने नागपुर ग्रामीण जिल्हयात कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला होता .सणोउत्सोव दरम्यान काही अनुचित प्रकार घडणार नाही या करीता नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक मा. श्री. हर्ष पोद्दार यांनी गंभीर दखल घेवुन सातत्याने अवैध धंदयावर कारवाई करणे कामी दिनांक १०/०३/२०२५ ते १४/०३/२०२५ रोजी पावेतो विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले होते. नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत **दिनांक** १०/०३/२०२५ ते १४/०३/२०२५ रोजी **दारूबंदी कायदाअंतर्गत तसेच एनडीपीएस कायदयान्वये, ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह** कारवाई बाबत विशेष मोहीम राबविली असुन सदर मोहीमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखे सह नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैध दारू बाबत कारावाई करून **२८६ गुन्हे नोंद केले.** सदर कारवाईत अवैध दारूचा **एकुण ४८,६०,७४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महाराष्ट्र दारूबंदी कायदयाअंतर्गत २८६गुन्हे दाखल केले आहे.**

**सदर मोहीमेअंतर्गत दिनांक** १०/०३/२०२५ ते १४/०३/२०२५ **रोजी पर्यंत** सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या **३३ अरोपीतांविरूध्द एनडीपीएस कायदया** अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच मदयपान करून वाहन चालविणाऱ्यांवर वाहन चालकांवर **जिल्हा वाहतुक शाखा नागपुर ग्रामीण** यांच्या सह सर्व पोलीस स्टेशन यांनी **एकूण २६५ ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह केसेस करण्यात आल्या आहेत.**